# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 21.04.2024** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- **लोकसभेच्या निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण. दुसऱ्या टप्प्यासाठी देशभरात प्रचाराला वेग.**
- **सरकार आणि राजकारण्यांनी इडी आणि सीबीआय या तपास संस्थाना स्वतंत्रपणे काम करू द्यावे , त्यांच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये, पंतप्रधानांच प्रतिपादन.**
- **ऑक्टाएफएक्स ट्रेडिंग ऍपमार्फत बेकायदा परकी चलन विनिमय गैरप्रकार प्रकरणी सक्तवसुली संचालनालयातर्फे मुंबई, कोलकाता, चेन्नई आणि दिल्लीमध्ये छापे.**
- **भारतीय कुस्तीपटू विनेश फोगट, अंशू मलिक आणि रीतीका हुडा पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र.**

**आणि**

- **महावीर जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभेच्छा, पंतप्रधानांच्या हस्ते आज नवी दिल्लीत 2550 व्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचे उद्घाटन.**

**उमेदवारी अर्ज-छाननी**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या तिसऱ्या टप्प्यात उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवारी पार पडली. त्यानंतर या अर्जांची छाननी प्रक्रिया काल पार पडली. या तिसऱ्या टप्प्यात दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधल्या 94 मतदारसंघांमध्ये पुढच्या महिन्याच्या सात तारखेला मतदान होणार आहे. या टप्प्यात सोमवारी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची शेवटची मुदत आहे. गुजरात विधानसभेच्या पाच जागांच्या पोटनिवडणुकीसाठीची छाननी काल पार पडली. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या टप्प्यात या महिन्याच्या 25 तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार असून, तेरा मेला मतदान होणार आहे.

**प्रचार-वेग**

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे पुढच्या टप्प्यांमध्ये प्रचाराला वेग आला आहे. सत्तारुढ आणि विरोधी आघाडीतले उमेदवार देशभरात प्रचारसभा घेत आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये केरळमधल्या बारा, कर्नाटकातल्या चौदा, राजस्थानातल्या तेरा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी आठ, मध्य प्रदेशातल्या सात, आसाम आणि बिहारमधल्या प्रत्येकी पाच, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन, तसंच जम्मू काश्मीर आणि त्रिपुरातल्या प्रत्येकी एका मतदारसंघात येत्या शुक्रवारी म्हणजे 26 तारखेला मतदान होणार आहे. पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते नरेंद्र

मोदी यांनी महाराष्ट्रातल्या नांदेड आणि परभणी तसंच कर्नाटकातल्या चिक्कबल्लारपूर आणि बेंगळुरू मतदारसंघांमध्ये सभा घेतल्या. मोदी यांनी नांदेडमधल्या सभेत बोलताना, निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबाबत समाधान व्यक्त केलं, तसंच मतदानाचं प्रमाण वाढवत नेण्याचं आवाहनही केलं. सरकारच्या धोरणांमुळे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजांमधल्या नागरिकांना फायदा झाला असून, 25 कोटींपेक्षा जास्त नागरिक दारिद्र्यरेषेच्या वर आले आहेत, असं त्यांनी कर्नाटकमधल्या सभेत सांगितलं. गेल्या दहा वर्षांमधल्या कामगिरीबाबत बोलताना ते म्हणाले, की सध्या भारत जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे, निर्यात आणि उत्पादन क्षेत्र वेगानं वाढत आहे आणि सध्या देशात परकीय गुंतवणूक विक्रमी प्रमाणावर होत आहे. माजी पंतप्रधान आणि धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच. डी. देवेगौडा यांनी कॉंग्रेसनं भ्रष्टाचाराची परिसीमा गाठल्याचा आरोप केला. कॉंग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी केरळमधल्या एरियाद इथं प्रचार सभा घेतली. सरकारी यंत्रणांनी कायद्याचं संरक्षण करणं अपेक्षित असतं मात्र त्या देशात खंडणीखोर बनल्याचा आरोप त्यांनी केला. कॉंग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांनी अमरोहा इथल्या सभेत बोलताना इंडी आघाडीचं सरकार स्थापन झाल्यास शेतकऱ्यांची कर्ज माफ केली जातील असं आश्वासन दिलं. मनरेगातून मिळणारी मजुरी आणि अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मिळणारं मानधन दुप्पट केलं जाईल असंही आश्वासन त्यांनी दिलं. भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी उत्तर प्रदेशातल्या मथुरा इथं प्रचारसभा घेतली. उत्तर प्रदेशातल्या सर्व ऐंशी जागांवर भाजपाचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात..**

**पंतप्रधान – मुलाखत**

सक्तवसुली संचालनालय आणि सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण यांसारख्या केंद्रीय संस्थाना स्वतंत्रपणे काम करू द्यावे ; सरकार आणि राजकारण्यांनी त्यांच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान केंद्रीय संस्थांच्या गैरवापराच्या आरोपांवरील प्रश्नाला उत्तर देताना, मोदी म्हणाले की ते फक्त त्यांची कामे करत आहेत आणि पंतप्रधान म्हणूनही आपल्याला ईडीच्या कामात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. 2014 पूर्वी, ईडीने केवळ 84 छापे घातले होते आणि 2014 नंतर एकूण 7 हजार छापे घालण्यात आले असून यावरून या संस्थांची कार्यक्षमता दिसून येते असंही मोदी यावेळी म्हणाले. दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना मोदी म्हणाले की, त्यांच्या सरकारचे मॉडेल देशातील प्रत्येक नागरिक विशेषत: गरीबांना सक्षम बनवणे असून देशातील नागरिकांचे ओझे कमी करणे ही सरकारची जबाबदारी आहे.

**नौदल सराव**

भारतीय नौदलानं पूर्व किनाऱ्यावर पूर्वी लहर हा सराव काल घेतला. या भागात सागरी सुरक्षेबाबतच्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी नौदलाची सज्जता पडताळून बघण्यासाठी हा सराव घेण्यात आला. या सरावात जहाजं, पाणबुड्या, विमानं आणि विशेष दलं यांचा समावेश होता असं संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे कळवलं आहे. जहाजांवरच्या संघर्षादरम्यान करायच्या कार्यवाही, विमानांचा वापर यांच्यासहित इतर अनेक गोष्टींचा सरावात समावेश होता. नौदलाच्या पूर्व विभागासह, हवाई दलाचा अंदमान आणि निकोबार विभाग, तटरक्षक दल यांचाही या सरावात सहभाग होता. या सरावाच्या यशामुळे सागरी

सुरक्षेबाबतच्या कोणत्याही आव्हानांना सामोरं जाण्यासाठी नौदल सज्ज असल्याचं स्पष्ट झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**फॉरेक्स**

ऑक्टाएफएक्स ट्रेडिंग ऍप आणि वेबसाइटच्या मार्फत बेकायदा परकी चलन विनिमय गैरप्रकार प्रकरणी सक्तवसुली संचालनालय म्हणजे ईडीतर्फे काल मुंबई, कोलकाता, चेन्नई आणि दिल्लीमध्ये छापे घालण्यात आले. या छाप्यांमध्ये दोन कोटी सत्तर लाख रुपयांचा बँक निधी गोठवण्यात आला आहे आणि डिजिटल उपकरणं ताब्यात घेण्यात आली आहेत, असं ईडीनं पत्रकात म्हटलं आहे. पुण्यातील शिवाजीनगर पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यावरून ईडीनं तपास सुरू केला आहे. परकी चलन विनिमयाच्या नावाखाली उच्च परताव्याचं आमिष दाखवून अनेकांची फसवणूक केल्याबाबत तपास सुरू आहे. आत्तापर्यंत क्रिप्टोकरन्सी, बँकांमधली रक्कम आणि सोन्याच्या नाण्यांच्या स्वरुपातली 35 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. या ऍपला परकी चलन विनिमयाची रिझर्व्ह बँकेकडून मान्यता नाही.

**राष्ट्रपती-शुभेच्छा**

महावीर जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान महावीर यांनी अहिंसा, सत्य आणि क्षमाशीलता यांचा मार्ग दाखवून दिला आणि त्यांची शिकवण मानवी कल्याणासाठी कायम मार्गदर्शक राहील, असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. या निमित्तानं आपण समाजात प्रेम आणि एकात्मता पसरवण्याचं देशाच्या विकासासाठी काम करण्याची प्रतिज्ञा करू या असंही त्यांनी संदेशात म्हटलं आहे.

**महावीर**

महावीर जयंतीच्या शुभ मुहूर्तावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं 2550 व्या भगवान महावीर निर्वाण महोत्सवाचे उद्घाटन करतील. यावेळी मोदी यांच्या हस्ते टपाल तिकीट आणि नाणं जारी केलं जाणार आहे.

**ऑलिंपिक**

भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगट, अंशू मलिक आणि रीतीका हुडा यांनी काल किर्गिस्तानच्या बिश्केक इथं झालेल्या आशियाई ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेत उत्तम कामगिरी करून पॅरिस ऑलिम्पिक 2024 साठी पात्रता मिळवण्यात यश मिळवलं. फोगटने 50 किलो वजनी गटात कझाकिस्तानच्या लॉरा गानिकिझीचा 10 - शून्य तर अंशूने 57 किलो गटात उझबेकिस्तानच्या लायलोखॉन सोबिरोवाचा 11–0 असा पराभव केला. रितिकाने ७६ किलो गटात चायनीज तैपेईच्या हुई टी चांगला ७-0 असं हरवलं. जागतिक पात्रता फेरीत कुस्तीपटूंना पॅरिस इथं होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्रता मिळवण्याची शेवटची संधी आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**